# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-०१

## प्रसिध्दीपत्रक

### शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) ऑगस्ट - २०१७ निकाल.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत ऑगस्ट - २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल दिनांक १६/१०/२०१७ रोजी ऑनलाईन पध्दतीने जाहीर करण्यात आला आहे. इंग्रजी ३० व ४० श.प्र.मि या विषयाची परीक्षा १८/०८/२०१७ ते २३/०८/२०१७ तसेच मराठी व हिंदी ३० व ४० श.प्र.मि. या विषयाची परीक्षा २८/०८/२०१७ व ३१/०८/२०१७ राज्यातील एकूण २२९ केंद्रावर ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल विद्यार्थ्यांना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना गुणपत्रकाची ऑनलाईन प्रिंट घेता येईल.

विद्यार्थ्यांची मूळ प्रमाणपत्रे/ गुणपत्रके व निकालाच्या प्रती सर्व जिल्हयांचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद सर्व व मुंबईसाठी विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, बालभवन, चर्नी रोड, मुंबई यांचे कार्यालयामार्फत संबंधित संगणक टंकलेखन संस्थांना वितरीत करण्यात येतील. विद्यार्थ्यांना त्यांची प्रमाणपत्रे/गुणपत्रके यथावकाश संगणक टंकलेखन संस्थामधून कार्यालयीन वेळेत मिळतील.

गुणपडताळणी व उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून १० दिवसांत परीक्षार्थीने संस्थेतून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. गुणपडताळणीसाठी प्रति विषय रु. १००/- व उत्तरपत्रिका छायाप्रती मिळण्यासाठी प्रति विषय रु.४००/- ऑनलाईन पध्दतीने बँक ऑफ इंडियाच्या(BOI) खाते क्र. ०५०००१०२१०००००३५ वर संस्था login व्दारे दिनांक २५/१०/२०१७ पर्यंत भरावेत. याबाबतच्या सविस्तर सूचना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर देण्यात आल्या आहेत.

#### निकालाची संक्षिप्त माहिती (३० श.प्र.मि.)

| परीक्षेचे नांव | परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी | उपस्थित | अनुपस्थित | उत्तीर्ण | अनुत्तीर्ण | राखीव | शेकडा निकाल (उपस्थिती अनुसरुन) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मराठी ३०श.प्र.मि<br>हिंदी ३० श.प्र.मि | २२२६५ | १८८२३ | ३४४२ | ६३६० | १२४९६ | ३७ | ३३.७८ % |
| इंग्रजी ३० श.प्र.मि | ३५५९१ | ३१२४१ | ४३५० | १४४९२ | १६७२७ | २२ | ४६.३८ % |
| एकूण | ५७८५६ | ५००६४ | ७७९२ | २०८५२ | २९२२३ | ५९ | ४१.६५ % |

#### निकालाची संक्षिप्त माहिती ( ४० श.प्र.मि.)

| परीक्षेचे नांव | परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी | उपस्थित | अनुपस्थित | उत्तीर्ण | अनुत्तीर्ण | राखीव | शेकडा निकाल (उपस्थिती अनुसरुन) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मराठी ४०श.प्र.मि<br>हिंदी ४० श.प्र.मि | ११५९ | १०३६ | १२३ | ४३२ | ५९९ | ५ | ४१.६९ % |
| इंग्रजी ४० श.प्र.मि | ७४९१ | ६८६१ | ६३० | ३२०१ | ३६४९ | ११ | ४६.६५ % |
| एकूण | ८६५० | ७८९७ | ७५३ | ३६३३ | ४२४८ | १६ | ४६ % |

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे -१